Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# सी एस आर: सामाजिक जबाबदारी व कर्तव्य कंपनी कायदा, 2013

**प्रा. डॉ. रेणूका दशरथराव बडवणे**
जालना समाजकार्य महाविद्यालय,
रामनगर जालना

**प्रस्तावना:**

सीएसआर म्हणजे व्यावसायिक व आद्योगीक स्तरावर होणाऱ्या नफ्याचा काही भाग, टक्केवारी ही समाजाचे देणे लागत असल्याची भावना. उद्योजकीय क्षेत्रात गेल्या अनेक वर्षापासून कंपन्या सामाजिक उत्तरदायित्व उत्तम प्रकारे निभावत आहेत असे दिसून येते, व या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर समाजाला शैक्षणिक ,आर्थिक, आरोग्य विषयक, फायदे मिळत असलेले ही दिसून येतात. त्याला कायदेशीर मान्यता मिळाल्याने ती सर्वांचीच सामाजिक व नैतिक जबाबदारी झाली असल्याचे दिसून येते.

सी एस आर म्हणजे कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी यालाच व्यवसायिक सामाजिक जबाबदारी असे म्हणतात. कंपन्यांमध्ये नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून मोठ्या प्रमाणात नफा मिळविला जातो, त्याचीच एक परतफेड करण्याची जबाबदारी म्हणून सीएसआर निधी ची तरतूद करण्यात आलेली असावी असे वाटते. खाजगी क्षेत्रातील कंपन्या नफ्याचा काही भाग बाजूला काढून ठेवतात व सामाजिक जबाबदारी म्हणून या निधीतून समाज उपयोगी कार्य करत असताना दिसून येतात कंपनी कायदा 2013 मध्ये यासंबंधी तरतूद करण्यात आलेले असून कंपनीला हा सीएसआर निधी जाणीवपूर्वक जमा करावा लागतो, व ते जमा करणे बंधनकारक आहे. सीएसआर प्रकल्पासाठी योग्य मूल्यांकनाची गरज आहे त्यासाठी प्रकल्पाची योग्य संकल्पना मांडून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे तसेच त्यावर नियमित देखरेख ठेवून त्याचा परिणाम होत आहे का याचे विश्लेषण देखील केले पाहिजे त्यानंतरच खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतील.

अनेक कंपन्या पूर्वीपासून सामाजिक उत्तरदायित्व निभावताना दिसून येतात. आता त्याला कायदेशीर मान्यता मिळाल्याने ती सर्वांची नैतिक जबाबदारी झालेली आहे. उद्योजक समाजाच्या व निसर्गाच्या अनेक संसाधनाचा वापर करत असतात, समाजाचे हे देणे फेडण्याची कृती म्हणजेच सीएसआर आहे. उद्योगांनी सी एस आर च्या माध्यमातून समाजासाठी खारीचा वाटा उचलला पाहिजे असेही त्यांनी नमूद केले आहे. सीएसआर बंधनकारक करणारा भारत हा जगातील पहिला देश असून समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी सीएसआर च्या प्रयत्नांना गती देण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे बियास यांनी सांगितले .

**सीएसआर कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी :**

सीएसआर याला व्यावसायिक सामाजिक जबाबदारी असेही संबोधले जाते. कंपन्यांमध्ये निसर्गातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून कंपनीला फायदा मिळवला जातो, त्या मोबदल्यात परतफेड करण्याची जबाबदारी म्हणून सीएसआर निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. कंपनी कायदा 2013 मध्ये यासंबंधीची तरतूद झालेली असून प्रत्येक खाजगी कंपनीला सीएसआर निधी जमा करणे बंधनकारक आहे.

**सामाजिक जबाबदारी :**

सामाजिक जबाबदारी म्हणजे समाजाप्रती असलेली सामाजिक जबाबदारी आपण समाजाला काहीतरी देणे लागतो आणि त्यासाठी समाजाला फायदा होईल असे कार्य केले पाहिजे या कार्यामध्ये विविध गोष्टी केल्या जाऊ शकतात उदाहरणार्थ गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षण उपलब्ध करून देणे, पाणी समस्या सोडविणे, रस्त्याची कामे पूर्ण करणे, गोरगरिबांसाठी कपड्यांचे वाटप व अन्नधान्याचे वाटप करणे इत्यादी सामान्य व्यक्तींसाठी सामाजिक जबाबदारी असते.

**कार्पोरेट जबाबदारी:**

कुठलीही कंपनी व्यवसाय करत असताना त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम समाजावर आणि निसर्गावर होत असतो. नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करत असताना निसर्गाला कमीत कमी नुकसान होईल असा प्रयत्न असलाच पाहिजे तसेच या मोबदल्यात निसर्गालाही आपण काहीतरी परत दिले पाहिजे जसे की वायु प्रदूषण, जलप्रदूषण, पर्यावरणाची हानी या गोष्टी कमी अधिक प्रमाणात होत असतात हे टाळण्यासाठी अथवा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते.

**आर्थिक व सामाजिक हित:**

विविध करांच्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागतो, याचबरोबर सामाजिक विकास देखील महत्त्वाचा असतो. ज्या प्रकारे देशाच्या अर्थव्यवस्थेत कंपन्यांचे मोठे योगदान असते त्या प्रकारे सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे म्हणून सीएसआर ही एक महत्त्वाची बाब आहे. जसे आयकर भरणे महत्त्वाचे आहे तसेच सीएसआर निधीतून सामाजिक कार्य करणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे ठरते.

**सीएसआर निधी कंपनी कायदा 2013 :**

2013 कलम 135 नुसार सीएसआर निधी संकलित करणे बंधनकारक आहे. यामध्ये रक्कम, अटी, उलाढाल ,भांडवल अशा सर्व गोष्टी दिलेल्या आहेत. ज्या कंपनीचा नफा पाच कोटीच्या वर आहे ज्यांची वार्षिक उलाढाल एक हजार कोटीपेक्षा जास्त आहे अशा कंपन्यांना या चार निधी जमा करणे बंधनकारक आहे.

**निष्कर्ष :**

गरिबी, कुपोषण, रस्त्यांच्या समस्या, पाणीप्रश्न, अन्न, निवारा असे अनेक प्रश्न देशासमोर आहेत. सी एस आर च्या माध्यमातून हे प्रश्न सोडवले जाऊ शकतात व थोड्याफार प्रमाणात हे प्रश्न मार्गी सुद्धा लागू शकतात. सीएसआर निधी योग्य प्रकारे कसा वापरावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे टाटा कंपनी जवळपास सर्वच क्षेत्रात अग्रेसर असणारी कंपनी आहे. सामाजिक कार्य करण्यात देखील अग्रेसर आहे सरकारकडून होणाऱ्या विविध योजनांपेक्षा सीएसआर च्या माध्यमातून होणारे कार्य मोठ्या प्रमाणामध्ये वाढविण्याचे कार्य टाटा कंपनीने केले आहे. व सीएसआर च्या माध्यमातून होणाऱ्या कार्यातून देशाची भरभराट तर होईलच शिवाय विविध समस्या मुळापासून नष्ट होऊ शकतील. सीएसआर एक कर्तव्य व सामाजिक जबाबदारी म्हणून प्रत्येक कंपन्यांनी व प्रत्येक उद्योगांनी याकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

सीएसआर संबंधित संशोधन लेखाचे लेखन हे गुगल वरील माहितीच्या आधारे विविध लेखांचे अध्ययन करून लिखाण करण्यात आलेले आहे.